www.dainikmahabharat.com | RNI No. MAHMAR/2015/64418 | jaymahabharat2015@gmail.com

दैनिक

# महाभारत

संपादक - विजयकुमार वाव्हळ

महाराष्ट्र • बीड (महाराष्ट्र) • दैनिक • मराठी • वर्ष - १० • अंक २७३ • गुरूवार दि.१५ मे २०२५ • किंमत २ रू. • पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक

दहावीच्या परीक्षेत गैरप्रकार १९ शिक्षकांवर गुन्हे दाखल



## राज्यात अवकाळी पावसाचा कहर:धाराशिवमध्ये केळी पिकाला फटका, नंदुरबारमध्ये टरबूजाची बाग जमीनदोस्त; शेतकरी हवालदिल

प्रतिनिधी । धाराशिव

राज्यातील अनेक भागांत मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्ग चिंतेच्या गर्तेत सापडला आहे. या पावसाने शेती पिकांना आणि फळबागांना मोठा फटका दिला असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. पिकासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी, असा सवाल आता शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. बीड, नंदुरबार आणि धाराशिव जिल्ह्यात अवकाळी पावसाच्या तडाख्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. बीडमध्ये मागील आठ दिवसांत वीस कोसळून तिघांचा मृत्यू झाला.

बीड जिल्ह्याला मागील आठ दिवसांपासून एकूण २४ गावांना अवकाळीचा तडाखा बसला आहे. ५ ते १३ मे या कालावधीत सुमारे १८ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. जिल्ह्यात वीज कोसळून तीन जणांना मृत्यू, तर एक जण जखमी झाला असून १६ जनावरे देखील दगावली आहेत. तर एकूण ५ घरांची पडझड झाली. महसूल प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे सुरू असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची अपेक्षा आहे.

धाराशिवमध्ये केळी पिकाला फटका

धाराशिव जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे केळी उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. अचानक येत असलेल्या वादळी वारा आणि पावसामुळे केळी पिकाला मोठा फटका बसत आहे. वारा आणि पावसामुळे केळीची पाने फाटत असल्याने त्याचा परिणाम थेट उत्पन्नावर होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठी अडचण निर्माण झाली असून हजारो रुपये खर्च करून सांभाळलेल्या या बागेतून खर्च तरी निघणार का?

### नंदुरबारमध्ये फळबागांचे मोठे नुकसान

नंदुरबार जिल्ह्यातील शनिमांडळ गावात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या टरबूज पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. एका शेतकऱ्याने तीन एकर क्षेत्रात टरबूज लागवड केली होती. मात्र अवकाळी पावसाच्या तडाख्याने संपूर्ण शेती जमीनदोस्त झाली. दीड ते दोन लाख रुपये खर्च करून उभी केलेली शेती एका रात्रीत वाया गेल्यामुळे शेतकऱ्याच्या पदरात केवळ निराशा आली आहे. या शेतकऱ्याच्या डोक्यावर सुमारे पाच लाखांचे कर्ज असून ते फेडणे आता अशक्यप्राय झालं आहे. त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी शासनाकडे मदतीची मागणी केली आहे.



## देवस्थान जमिनीच्या व्यवहारांना ब्रेक

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे नोंदणी विभागाला निर्देश

महाराष्ट्र शासनानं देवस्थान वतन जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारांवरील नोंदणी प्रक्रिया तत्काळ थांबविण्याचे निर्देश दिले आहेत. पुणे येथील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या उपमहानिरीक्षक (मुख्यालय) कार्यालयातून जारी झालेल्या परिपत्रकानुसार, शासन धोरण ठरविण्यात येईपर्यंत कोणत्याही देवस्थान इनाम मिळकतींच्या दस्तऐवजांची नोंदणी करता येणार नाही.हा निर्णय १३ मे रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली, कोल्हापूरचे पालकमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या ऑनलाइन बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत देवस्थान वतन जमिनींसंबंधी अनधिकृत व्यवहार रोखण्यासाठी धोरणात्मक चर्चा झाली आहे.

जमिनींचे व्यवहार थांबणार

शासन धोरण येईपर्यंत देवस्थान जमिनींचे व्यवहार थांबवा असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी विभागास दिले आहेत. फक्त न्यायालयीन आदेश किंवा अधिकृत मंजुरी असलेल्या जमिनींचेच दस्त नोंदणीस मान्य देण्यात येणार आहे.

१३ मे २०२५ रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन बैठक झाली होती. त्यात देवस्थान मिळकतीबाबत निर्देश देण्यात आले. देवस्थान इनाम मिळकतीच्या अनुषंगाने शासन स्तरावर धोरण ठरवण्यात येत आहे.




### या जमिनीचे व्यवहार टाळा

महसूल विभागाच्या या नवीन आदेशापूर्वी सुद्धा अनेकदा या खात्याने शेतकरी आणि इतरांना अशा जमिनी खरेदी करताना खबरदारीचा इशारा दिला होता. देवस्थान व राखीव वन नोंदी असलेल्या जमिनीची खरेदी डोकेदुखी ठरू शकते. कारण या जमिनीची मालकीचा प्रश्न अडचणीचा ठरतो. अशा जमिनीवर एकतर नावावर होत नाही. त्यामुळे आर्थिक तोटाही होतो. जमीन पण हातातून जाते आणि उल्लंघनाची कारवाई होते ती वेगळीच. काही एजंट विविध यंत्रणांना हाताशी धरून या जमिनी नावे लावून देतात. पण प्रकरण उघड झाले की नामनिराळे होतात. या व्यवहारात जमीन खरेदीदारांचे सर्वात जास्त नुकसान होते. त्यामुळे अशा जमिनी खरेदीचे व्यवहार टाळणे शहाणपणाचे ठरेल.




Bharat Petroleum | PRATHAMESH GAS AGENCY | महाभारत

•शुभेच्छुक: प्रथमेश गॅस एजन्सी कर्मचारी वृंद

# रहदारीस अडथळा करणारी अतिक्रमणे हटविली मंजरथ ग्रामपंचायतीची अतिक्रमण धारकांवर कारवाई

## मुख्यरस्त्यासह चौकाने घेतला मोकळा श्वास

माजलगाव : अमर साळवे
(दै. महाभारत)

तालुक्यातील मंजरथ गावातील मुख्य रस्त्यावर व मुख्य चौकामध्ये रहदारीस अडथळा निर्माण करणारी अनेक अतिक्रमणे ग्रामपंचायतीच्या वतीने काढण्यात आली असल्याने मुख्य रस्ता व चौकाने मोकळा श्वास घेतला आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने अतिक्रमण धारकांना नोटीसा देत अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत.

शहरापासुन अकरा किलोमिटर अंतरावर गोदावरील नदीतिरावर साडेतिन हजार लोकसंख्येचे मंजरथ गाव आहे. मंजरथ गावाची दक्षिण प्रयाग म्हणुन राज्यभर आगळी - वेगळी ओळख आहे. तीर्थक्षेत्राचे ठिकाण असल्याने गोदावरील नदीतिरावर अस्थीविसर्जन, दशक्रिया विधीसाठी राज्यभरातुन लोक येतात. त्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे गावातील लोकांनी मुख्य रस्ता, मुख्य चौक व गंगातिरावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे केली होती. परिणामी येणा-या भाविकांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता तर रस्ता देखील अरूंद झाल्याने बस गावात येत नव्हती. प्रवाशांना पायी किंवा खाजगी वाहतुकीचा आधार घ्यावा लागत होता. त्यामुळे ही अतिक्रमणे काढण्यात यावी अशी मागणी होती. ऐतिहासिक वास्तुंमुळे गावाला तिर्थक्षेत्र विकासाचा दर्जा प्राप्त आहे. गोदावरी, सिंदफणा व गुप्त सरस्वती या नद्यांचा त्रिवेणी संगम आहे. त्यामुळे दशक्रिया विधीसह इतर धार्मिक विधींसाठी राज्यभरातुन दररोज नागरिक याठिकाणी येतात. दिवसभरात एक हजार लोकांची ये - जा असते. त्यामुळे रहदारीस सदरील अतिक्रमणे अडथळा करत असल्याने ग्रामपंचायतीच्या वतीने नोटीसा देउन अतिक्रमणे काढण्यात आल्याने मुख्य रस्त्यासह चौकाने मोकळा श्वास घेतला आहे. दरम्यान माजलगाव - मंजरथ



रस्त्याचे देखील काम सुरू असुन या अतिक्रमण काढल्यामुळे रस्ता काम देखील चांगले होण्यास मदत मिळणार आहे. यावेळी सरपंच भागवत पोहेकर, उपसरपंच कालिंदा आळसे, सदस्य रामेश्वर काळे, सदस्या शारदा खरात, ज्ञानेश्वर चुंबळे, योजना पराड, सिंधु परसे, मिना चोरमले, आकाश अस्वले, शालिनी उपाध्ये, अशोक आळसे, कोमल येळवे, ग्रामविकास अधिकारी डी. आर. राउत यांचेसह कर्मचारी उपस्थित होते.

यांचे काढले अतिक्रमणे

मुनीर शेख, विश्वनाथ कदम, रामभाउ येळवे, धुराजी गायकवाड, गोविंद गायकवाड, परमेश्वर चुंबळे, बाबु गायकवाड, संतोष शिंदे, ज्ञानेश्वर चुंबळे, भागवत शिंदे, युनुस शेख, अमोल वनकर, पांडुरंग शिंदे, मारोती पराड, नजीर शेख, नारायण राउत, बशीर शेख, सुरेंद्र थोरात यांचे पत्र्याचे शेड, किराणा दुकान, पंक्चर दुकान, सलुन, चिकन सेंटर, मशिनरी, हॉटेल ही रहदारीस अडथळा करणारे अतिक्रमणे काढण्यात आली आहेत.

मुख्य रस्ता व गंगाकडेवर असलेली विवीध अतिक्रमणे काढण्यात आली असुन भविष्यात याठिकाणी व्यावसायिक गाळे निर्माण केले जाणार आहेत. या अतिक्रमण काढल्यामुळे माजलगाव - मंजरथ रस्ता रूंद होणार असुन भाविकांसह ग्रामस्थांची होत असलेली गैरसोय दुर होणार आहे. - भागवत पोहेकर, सरपंच मंजरथ.



# कायदा समजून घेण्याची गरज : : बाळकृष्ण मते

कुडूत्री / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

कायद्याचा अभ्यास व माहिती असणे हे भविष्यातील काळाची गरज आहे असे मत अध्यक्ष स्थानावरून बोलताना श्री बाळकृष्ण मते यांनी बोलताना व्यक्त केले . ते जनकल्याण फाउंडेशन वाई सातारा यांच्या वतीने वाशी तालुका करवीर येथे दुसरे अधिवेशन वर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

या चर्चासत्राच्या वेळी मान्यवरांच्या हस्ते विविध दैनिकांच्या पत्रकारांचा सत्कार करण्यात आला .संजय कुराडे ,सुनील गुजर व संघटनेचे सचिव प्रकाश उघडे यांनी कलम चार बाबत व ज्ञानदेव सनद या सर्वांनी मार्गदर्शन केले . या महाचर्चासाठी कोल्हापूर जिल्ह्यातून विविध संघटना कायदा प्रेमी नागरिक यांनी, मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. सदर महाचर्चासत्राचे नियोजन राज्य सदस्य अतुल पाटील यांनी केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश शिंदे तर स्वागत सचिन दळवी यांनी केले असून या महाचर्चासत्रासाठी कोल्हापूर जिल्ह्यातून उत्तम जाधव ,रंजीत पाटील, सुमित शिंदे अमित बुडके ,विनोद व्हराटे, शिवाजी असणेकर, ज्योतिबा पाटील, निलेश चौगले उपस्थित होते .कार्यक्रमाचे आभार संदीप गाढवे यांनी मानले.

# जागतिक मातृदिन निमित्त राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै.महाभारत)

नाशिक येथील पुष्परत्न बहुउद्देशिय सेवाभावी संस्था व आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी नाशिक यांच्या वतीने रविवार रोजी लायन्स क्लब सभागृह,पंडित कॉलनी नाशिक येथे जागतिक मातृदिना निमित्ताने राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटक संगिता निकम (डि.वाय.एस.पी- कमिशनर ऑफीस,नाशिक) ,कार्यक्रमाचे अध्यक्ष, मा.डॉ.संजीव सोनवणे ( कुलगुरु- यशवंतराव चव्हाण,महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक) ,प्रमुख पाहुणे मा.सौ.सुषमाताई देसले पाटील ( अंमळनेर) मा.वासुदेव देसले साहेब डि.वा.एस.पी.नाशिक ग्रामिण, मा.विजय नामदेव भंदुरे उपस्थित होते.

सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महामातांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजकप्रा.डॉ.आनंद आहिरे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे स्वागत मानचिन्ह व सन्मानपत्र देवून करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा.डॉ.आनंद आहिरे यांनी सांगितले की,सर्वांच्या जीवनात आईला अनन्यसाधारण महत्व आहे.महाराष्ट्रातील विविध भागातील



मातांचा व त्यांनी स्व कष्टातून घडविलेला मुलगा व मुलीचा हा सन्मान सोहळा आहे.पुष्परत्न बहुउद्देशिय सेवाभावी संस्था नेहमीच विविध आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार आयोजित करत असते.

कुलगुरु डॉ.सजीव सोनावणे यांनी सांगितले की,संपुर्ण जगाची उत्पत्ती ही आई पासून झालेली आहे.पुष्परत्न संस्थेला नेहमीच कौतुकाची थाप देत राहू. डि.वाय.एस.पी.संगीता निकम यांनी आई ही खुप महान आहे तिला व्यक्त करता येत नाही. तर डि.वाय.एस.पी. वासुदेव देसले यांनी प्रतिपादन करतांना असे म्हटले की,जगातील सर्व माता वंदनीय आहे.प्रत्येक आईची भावना,ममत्व हे शब्दात वर्णन करता येणार नाही.प्रत्येकांनी आपले विचार मांडले.व प्रा.डॉ.आनंद आहिरे यांचे अभिनंदन व कौतुक केले.

मान्यवरांच्या हस्ते माता व त्यांचे सुपुत्र व कन्यारत्नांचा राज्यस्तरीय मातृवात्सल्य पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले .दगडू लोमटे अंबाजोगाई यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.शेवटी उपस्थित सर्वांचे आभार धनंजय चतुर यांनी मानले.

# सौ. ज्योती बनकर-भुसारी यांचा साहित्यधारा संस्थेकडून 'आदर्श गायिका' म्हणून मानाचा सन्मान

भंडारा (दै.महाभारत)

साहित्य, कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याची उदात्त परंपरा जतन करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर येथील साहित्यधारा बहुउद्देशीय संस्थेने नुकताच एक भव्य सत्कार समारंभ आयोजित केला. या समारंभात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्यात आला, ज्यात भंडारा जिल्ह्याच्या तुमसर येथील सुप्रसिद्ध गायिका सौ. ज्योती बनकर-भुसारी यांचा 'आदर्श गायिका' म्हणून केलेला गौरव विशेष लक्षवेधी ठरला.

दिनांक ११ मे २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित या शानदार सोहळ्यात चित्रपट अभिनेते श्री. सतीश कुलकर्णी आणि समाज कल्याण सभापती सौ.जयश्री सोनकावळे यांच्यासारख्या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. साहित्यधारा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष डॉ. संघर्ष सावळे यांच्या कुशल नेतृत्वाखाली हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला. या प्रसंगी महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या अनेक प्रतिष्ठित व्यक्तींचा यथोचित सत्कार करण्यात आला.

नागपूर विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सौ. ज्योती बनकर-भुसारी यांची 'आदर्श गायिका' म्हणून निवड होणे, हा भंडारा जिल्ह्यासाठी गौरवाचा क्षण आहे. तुमसर येथील प्रतिष्ठित श्री. भैय्यालालजी बनकर यांच्या त्या सून असून, त्यांच्या प्रेरणेमुळेच सौ. ज्योती यांना या संगीत क्षेत्रात यशस्वी पदार्पण करता आले. तसेच आई वडलांच्या माहेर घरी भंडारा जिल्ह्यातील पालांदूर या लहानशा गावातून त्यांच्या गायन कलेचा अंकुर फुलला आणि आज त्यांनी आपल्या सुमधुर आवाजाने भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर यांसारख्या अनेक जिल्ह्यांमध्ये श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे. विविध सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांमधून त्यांनी आपल्या कलेची प्रभावी छाप सोडली आहे.

लहानपणापासूनच संगीताची आराधना करणाऱ्या सौ. ज्योती बनकर-भुसारी यांना साहित्यधारा संस्थेने दिलेल्या या सन्मानामुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना त्या म्हणाल्या, माझे सासर आणि माहेर घरी आई-वडील आणि भाऊ यांच्या सततच्या पाठिंब्यामुळेच मी हे यश संपादन करू शकले.माझ्या सासरी मला कधीही अशे जाणवले नाही की मी इथे सून म्हणून, फक्त घर संसार नांदायला आली नसून, मला त्यांनी माझ्या माहेरी आई वडलांसारख स्वतःच्या मुली सारखं प्रेम दिलं. तसेच माझे पती विलास बनकर हे देखील नेहमीच माझ्या पाठीशी उभे राहतात तसेच सासरचा सुद्धा साथ मला या आज मिळालेल्या यशामागे खूप मोठा कारण असल्याचे सौ. ज्योती बनकर यांनी आभार प्रदर्शन करतानाही सांगितले.



# समिक्षा वाघमारेचे शालांत परीक्षेत ९२ टक्के गुणांसह दैदिप्यमान यश

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

परळीच्या भिमवाडी येथील रहिवासी व विद्यावर्धिनी विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी समीक्षा धम्मपाल वाघमारे यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९२. ८० टक्के गुण घेऊन दैदिप्यमान यश मिळवले आहे. कु.समिक्षा धम्मपाल वाघमारे ही वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रा.दासू वाघमारे यांची पुतणी आहे. शहरातील विद्यावर्धिनी विद्यालयाची ती विद्यार्थिनी आहे.नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत तिने



९२.८० टक्के गुण प्राप्त केले आहेत. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी, वाघमारे कुटुंबीयांनी व आदिंनी तिचे अभिनंदन केले आहे.

# सिबीएससी पॅटर्नच्या १० वी परिक्षेत ९४.४% गुण; चि. रणवीर रमेश रोडेचे घवघवीत यश



परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा सिबीएससी पॅटर्नच्या दहावीच्या परीक्षेत चि.रणवीर रमेश रोडे याने ९४.४% गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

परळी वैजनाथ येथील भेल सेकंडरी स्कुलचा चि.चि.रणवीर रमेश रोडे हा विद्यार्थी आदर्श शिक्षक नामदेवराव रोडे गुरुजी यांचा नातु तर दिवंगत रमेश रोडे यांचा मुलगा याने आठ महिन्यापूर्वीच त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते ह्या दुःखातून सावरून सुद्धा सिबीएससी बोर्डाच्या दहावीची परिक्षा दिली. त्याने ९४.४ टक्के गुण संपादन करून घवघवीत यश प्राप्त केले आहे. रणविरने मिळवलेल्या या घवघवीत यशबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, मित्र परिवार आदींनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# परळीत २० मे रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर सीटू कामगार संघटनेचा मोर्चा

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

महाराष्ट्र कामगार संयुक्त कृती समीतीच्या वतीने महाराष्ट्रव्यापी संप आहे. बीड जिल्हा सीटू कामगार संघटना संपात सहभागी होत आहे. त्या दिवसी परळी तालुक्यातील सीटूशी जोडलेल्या कामगार संघटना परळी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी १ वाजता भव्य मोर्चा काढणार आहेत. राज्य सरकार व केंद्र सरकारचे कामगार विरोधी थोरणामुळे प्रचंड बेरोजगारी निर्माण झालेली आहे.

आशा वर्कर व अंगणवाडी कर्मचारी यांना सरकारी कामगारांचा दर्जा मिळावा, खाजगीकरण थांबवावे, सरकारने कंत्राटीकरण थांबवावे, कामगारासाठीच्या चार कामगार संहीता मागे घ्याव्यात, कामगारांना किमान वेतन २६०००रु द्यावे: सर्व ६० वर्षावरील पेन्शन नसणाऱ्या सर्व नागरीकांना १०००० रु पेन्शन द्यावी.परळी तालुक्यातील आशाचे सर्व प्रकारचे थकीत मानधन द्यावे, घरेलू कामगार कल्याणकारी मंडळाने घरेलू कामगारांच्या पहिल्या दोन मुलांना शिष्यवृत्ती द्यावी, बांधकाम कामगारांचे सर्व प्रश्न तालुक्यातील डब्लूएफसी केंद्राने सोडवावेत. ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी ग्रामसेवकांनी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र द्यावे इत्यादी प्रमुख मागणीसाठी परळी तालुक्यातील बांधकाम कामगार, आशा, घरेलू कामगार असंघटित कामगार मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहे. कामगारांनी मोठ्या संस्थेने मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहान आशाच्या नेत्या हेमा काळे, आशा लांडगे, किरण सावजी, सिटूचे जिल्हा अध्यक्ष प्रा.बी.जी खाडे, शेख जावेद, कामगारनेते जालिंदर गिरी, घरकामगार रोहिणी लोणीकर यांनी केले आहे.

# वाढदिवसाच्या निमित्ताने ५ लाख ३७ रूपये जमा झाले, पंतप्रधान सहाय्यता निधीला अक्षय मुंदडा रक्कम जमा करणार

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै.महाभारत)

राजकीय क्षेत्रात काम करणारा तरूण संवेदनशील भुमिकेत वागत असेल तर खर्या अर्थाने समाज आदर्शाचे अनुकरण निश्चित करतात. भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडांनी स्वत:चा वाढदिवस साधेपणाने साजरा करताना विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले. शिवाय शुभेच्छा देणार्या हितचिंतकांनी पंतप्रधान सहाय्यता निधीला योगदान देण्याचे आवाहन केल्यानंतर दिवसभरात सुमारे ५ लाख ३७ हजार रूपयाचा निधी जमा झाला तर ७५ तरूणांनी रक्तदान केले.

भारत-पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर मुंदडांनी वाढदिवस रद्द करून सामाजिक उपक्रम हाती घेण्याचे आवाहन केले होते. शुभेच्छा देण्यासाठी येणार्या कार्यकर्ते, मित्र परिवारांनी हार-तुरे न आणता पंतप्रधान सहाय्यता निधीला अर्थसहाय्य योगदान देण्याची विनंती केली होती. त्यानुसार अक्षय बंगल्यावर दिवसभर शुभेच्छा देणार्याची गर्दी होती. मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित केले. त्यात ७५ तरूणांनी रक्तदान केले. पंतप्रधान सहाय्यता निधीमध्ये शुभेच्छा देण्यासाठी येणार्या सर्वांनीच योगदानाच्या माध्यमातुन सहभाग घेतला. दिवसभरानंतर सायंकाळच्या सुमारास एकुण रक्कम जमा सुमारे ५ लाख ३७ हजार झाल्याची माहिती भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी दिली. तसं पहाता राजकारणात वाढदिवस थाटामाटाने साजरा करण्याची फॅशन आली असताना असा एखादा तरूण नेता सामाजिक संवेदना ज्यातुन राष्ट्रभक्तीचे आदर्श निर्माण करतो, खर्या अर्थाने कौतुकास्पद म्हणावे लागेल. वाढदिवसाच्या निमित्ताने दिवसभर बंगल्यावर अक्षय मुंदडा बसुन होते. मात्र साध्या पुष्पगुच्छाचा देखील स्विकार केला नाही. वास्तविक पहाता भारताने पहेलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचा ऑपरेशन सिंदुर द्वारे जबरदस्त बदला घेतला. पण युद्धजन्य परिस्थितीमुळे वाढदिवस त्यांनी साजरा केला नाही. विविध सामाजिक उपक्रम कार्यकर्त्यांनी घेतले ज्यामध्ये वृक्षारोपण, आत्महत्याग्रस्त शेतकर्यांना बियाणाचे वाटप, मधुमेह तपासणी तथा इतर कार्यक्रम. सामाजिक कार्याचे आदर्श नेतृत्वाकडून जेव्हा प्रस्थापित होतात त्यावेळी संवेदनशीलता वाढते. याच आदर्शाची पेरणी केज मतदारसंघात मुंदडा कुटुंबियांनी १९८० ते ९०च्या दशकापासून केली तोच वारसा सुपुत्राच्या माध्यमातुन पुढे सुरू झालेला दिसतो. सामान्य जनतेच्या सुखदु:खात सहभागी व्हायचं आणि



गोरगरिबांची सेवा करायची हा मुळ पिंड कुटुंबियांचा आहे. वर्तमानकाळात लग्नसराईचे दिवस असल्याने आ.सौ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा आणि अक्षय संपुर्ण मतदारसंघात लग्नाचे निमंत्रण तिथे यांचे पाऊल मोसमात नाही म्हटले तरी १५१ पेक्षा अधिक लग्न कुटुंबियांनी लावल्याचे कळते.

## बेधडक

**अवकाळी पाऊस...!**

नेहमी अकस्मातपणे त्याच
आगमन होत असतं,
फायदा मात्र कधीतरीच
जास्त नुकसानच होतं असतं...!

निसर्गाचं चक्रच जणू
त्याच्याच मर्जीप्रमाणे चालतं,
एखाद्यावेळीच अवकाळी येणं
त्याची सर्वोत्तम खेळी ठरतं...!!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४

दैनिक जय महाभारत संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com * टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन तथागत भागवान गौतम बुद्ध याची जयंती विविध उपक्रमाने साजरी

माजलगाव : अमर साळवे
(दै. महाभारत)

भारतीय बौद्ध महासभा तालुका याजलगावच्या वतीन तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९व्या जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली त्या अनुशंगाने दि १ मे २०२५ ते ५ मे २०२५ या कालावधीत त्रिसरण बुद्ध विहार चिंचगव्हाण येथे महिला उपासिका शिबीर संपन्न झाले,४ मे २०२५रोजी बुद्ध विहार संम्राट अशोक नगर येते अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर संपन्न झाले आणी दि ३ मे२०२५ पासुन चालु झालेले पुज्य भन्ते दिपरत्न यांच्या नेतृत्वात सांची बुद्ध विहार, डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते १० दिवशीय बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचा समारोप दि १२मे २०२५ वार सोमवार वैशाख पौर्णिमा या दिवशी सकाळी ८.वा डॉ आंबेडकर चौक ते सांची बुद्ध विहार आसी तथागत भगवान बुद्धाच्या मुर्ती ठेउन भिख्खू संघासमवेत भव्य धम्मरॅली काढण्यात आली या रॅलीत तालुक्यातील धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्तीत होते या नंतर सांची बुद्ध विहार येते पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व चे जिल्हा अध्यक्ष आद.बी बी धन्वे सर यांच्या हस्ते करण्यात आले या नंतर संघ भोजन होऊंन पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्त्यांचे पुज्यन पुज्य.भन्ते दिपरत्न व भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा अध्यक्ष बी बी धन्वे सर , केंद्रीय शिक्षक एस बी मोरे , ता अध्यक्ष डॉ भागवत साळवे व सर्व जिल्हा पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते या कार्यक्रमात श्रामणेर शिबीरातील शिबीरार्थींचे मनोगत झाली बीड जिल्हा पुर्व चे जिल्हा अध्यक्ष आद .बी बी धन्वे सर व केंद्रीय शिक्षक आद.एस बी मोरे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा संस्कार उपाध्यक्षा आद धन्वे ताई ,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, आशाताई मोरे,जिल्हा पर्यटन सचिव ,एन बी राजभोज जिल्हा संघटक बी सी डोंगरे,शोभाताई भोजने, शारदाताई तांगडे केन्द्रीय शिक्षिका लिलाताई उजगरे, वंचित आघाड़ीचे नेते अंकुश जाधव ,अशोक पौळ, बसपा चे ॲड .अमोल डोंगरे पत्रकार किसन भदर्गे पत्रकार राजरत्न डोंगरे,अभिमान वाघमारे,विलास साळवे ,अशोक मगर , दिनेश निसर्गंध, अश्विन टाकणखार,सह विविध पक्षांचे पदाधिकारी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्तीत होते या कार्यक्रमाच




सुत्रसंचलन सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर सुत्रसंचलन गुलाब धाईजे यांनी केले तसेच या कार्यक्रमासह शिबीर यशस्वी करण्यासाठी दयानंद साळवे, नितिन डोंगरे,मोहन काकडे,बळीराम काकडे, भगवान डोंगरे,डि एस साळवे, समाधान साळवे, तात्यासाहेब साळवे अमोल टाकणखार, कोमल डोंगरे,अनुराधाताई साळवे,मायाताई स्वामी,शारदाताई टाकणखार,वंदनाताई घनघाव, अनिकेत घनघाव डी पी वाघमारे नाना, डी पी पोटभरे, संभाजी धाईजे, सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व धम्म उपासक यांनी परिश्रम घेतले .



# बुखारी उर्दू माध्यमिक विद्यालयाचा ९७ टक्के निकाल

माजलगाव : अमर साळवे
(दै. महाभारत)

माजलगाव येथील बुखारी उर्दू माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत शालांत परीक्षा फेब्रुवारी २०२५ मध्ये मंडळा मार्फत घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांकावर चाऊस जैनब खालेद ८४.२०% द्वितीय क्रमांकावर आयेशा सालम बिन गानम ८३% तृतीय क्रमांकावर शेख आलिया जफर ८२.२०% व तसेच मुलांमध्ये सर्वप्रथम शेख जिशान हारून याने ७९% गुण प्राप्त केले या यशाबद्दल बुखारी उर्दू एज्युकेशनल संस्थेचे सचिव खुर्शीद नाईक साहेब संस्थेचे अध्यक्ष अझहर नाईक साहेब सहसचिव इम्रान नाईक साहेब व मुख्याध्यापक शेख हारून बशीरोद्दीन व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गल्लेबोरगाव ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी कांताबाई दिलीपसिंग बेडवाल यांची बिनविरोध निवड

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव येथील ग्रामपंचायतचे उपसरपंच पद मागील तीन महिन्यापासून रिक्त होते बुधवारी (दि. १४) प्रशासनाच्या आदेशानुसार निवड प्रक्रिया पुर्ण करत सौ कांताबाई दिलीपसिंग बेडवाल यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सरपंच विशाल खोसरे निवडणुक निर्णय अधिकारी सौ. दुतोंडे, ग्रामसेवक विस्तार अधिकारी श्री फुलचंद सोनवणे, तलाठी सौ कल्पना डिघोळे, पोलीस पाटील सौ सिंधुताई बढे ग्रामपंचायत सदस्या सौ लताबाई




विजय खोसरे, सौ मुक्ताबाई संजय भागवत सौ मंदाबाई शेषराव भागवत, सौ मिनाबाई प्रकाश शेवारे, सौ कलाबाई शंकर दुधारे, सौ ताराबाई शंकर बुखार, रामदास चंद्रटिके, संदीप सिरसाट, शाम करडिले, संजय भागवत, गजानन हारदे,विठ्ठलराव हारदे श्री सचिन भोजने, धनंजय भागवत, राजेंद्र बढे, लक्ष्मण आमृते, साजीद शेख पोलीस कर्मचारी मनोहर पुंगळे, शंकर बुखार, तुषार खोसरे, भिमसिंग राजपुत, गणेश खोसरे, सुनिल तळेकर , अनिल खोसरे सह गावातील ग्रामस्थ मोठ्या

# वीरशैव लिंगायत समाजाच्या गुणवंतांना यंदाही मिळणार शिष्यवृत्ती

## दहावी, बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा; श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आवाहन

माजलगाव : अमर साळवे
(दै. महाभारत)

येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या वतीने यंदाही वीरशैव लिंगायत समाजातील दहावी आणि बारावीच्या ८५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. दरम्यान, दहावी आणि बारावी परीक्षेतील यशस्वी गुणवंतांचे श्री संस्थान मठातर्फे अभिनंदन करण्यात आले आणि मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी



गुणवंतांना शुभाशीर्वाद दिले.

लिंगैक्य श्री गुरू तपोरत्न प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज माजलगावकर यांनी अनेक वर्षांपासून समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली. यंदाही गुरूपौर्णिमेला या शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त करण्यासाठी दहावी किंवा बारावीच्या परीक्षेत ८५ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका आवश्यक असून सोबत आधारकार्डची प्रत येत्या दिनांक ०१ जुलै २०२५ पर्यंत प्रत्यक्षात सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाच्या व्यवस्थापनाकडे द्यावेत, असे आवाहनही श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी शिवहारआप्पा महाजन (भ्रमणध्वनी क्रमांक ८२७५८५२८९८) यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठ माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे.

# ना. पंकजाताई मुंडेंचा ऐतिहासिक निर्णय

## पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या आता होणार समुपदेशनाने

मुंबई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा व बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला आहे.

समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही दि. १५ व १६ मे २०२५ रोजी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेदरम्यान सुमारे ६५० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहेत.पशुसंवर्धन विभाग व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना केल्यानंतर काही नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यामुळे एकत्रित पशुसंवर्धन विभागांतर्गत रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे तीन हजार पेक्षा जास्त पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून नजिकच्या काळात सदर पदे भरली जाणे अभिप्रेत आहे.

### पारदर्शक कारभार ; पसंतीनुसार बदल्या

पशुसंवर्धन विभागातील मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा, यासाठी पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातील प्राधान्याने भरावयाची पदे निश्चित करण्यात आली आहेत. या पदांवर बदलीने पदस्थापना करण्यासाठी बदलीपात्र अधिकाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली देण्यासाठी समुपदेशनाची कार्यपध्दती अवलंबण्यात येणार आहे. त्याव्दारे बदलीपात्र अधिकाऱ्यांना प्राधान्यक्रम व जेष्ठतेनुसार उपलब्ध पदांमधून त्यांच्या पसंतीचे ठिकाण निवडण्याची संधी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे.

समुपदेशनाने बदलीची कार्यपध्दती पार पाडताना ती पारदर्शकपणे पार पाडली जाईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून यामध्ये बदलीसाठी निर्धारित करण्यात आलेली पदे, दिव्यांग, गंभीर आजार असलेले कर्मचारी, असक्षम पाल्य, विधवा किंवा परित्यक्ता असलेल्या महिला, पती-पत्नी एकत्रिकरण अशी वर्गवारी करण्यात आली आहे. बदलीपात्र अधिकाऱ्यांची वर्गवारीनिहाय जेष्ठता यादी व बदलीसाठी उपलब्ध पदे यांची यादी विभागाच्या पशुसंवर्धन संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याची लिंक सर्व संबंधित अधिकाऱ्यांनाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर वर्गवारीतील जेष्ठ अधिकाऱ्यांस बदलीचे ठिकाण निवडण्यासाठी प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

# कोपरगाव तहसील कार्यालय अंतर्गतच ऑनलाईन नोंदणी कामे व्हावी

धामोरी / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

दत्तात्रय घुले कोपरगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांची विविध कामे कोपरगाव तहसील कार्यालयात कामे असतात.रेशनकार्ड वरील नवीन नाव समाविष्ट करणे ,चुकीचे दुरूस्त करणे,शेती संदर्भातील ऑनलाईन नोंदणी कामे. असे विविध कामे तहसील कार्यालयाच्या अंतर्गतच झाली पाहिजे अशी मागणी तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक नागरिकांनी केली जाते.

आमचे मित्र नुकतेच काल कोपरगाव तहसील कार्यालयात आपल्या रेशन कार्ड यादीत एक नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी गेले असता.आमच्या ऑफिसमधे ते होत नाही .तुम्हाला ते सेतु कार्यालयातच करावे लागणार असे सांगितले. आणी या सेतु कार्यालयात अव्वा ते सव्वा फी आकारली जाते.परंतु साधारण मोल मंजुरी करणारा नागरिकांचे काय ? असा सवाल मोल मजुरांची होत आहे.




तरी संबंधित कोपरगाव तहसीलदार कार्यालय अधिकारी यांनी या विषयावर लक्ष देवुन आपल्या कार्यालयातच ऑनलाईन नोंदणी कामे सुरू करावी अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांनी केली आहे.

# मानव विकास मूकबधिर विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के

## विद्यार्थ्यांचे परिश्रम व शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे शंभर टक्के निकालाचे सातत्य – राजकिशोर मोदी

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै.महाभारत)

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित मानव विकास निवासी मूकबधिर विद्यालयाचा शालांत परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून यावर्षीही विद्यालयातील विद्यार्थ्यांनी १०० टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे. मानव विकास निवासी मूकबधिर विद्यालयाचा माध्यमिक शालांत परीक्षेच्या निकालात यावर्षी शाळेचा निकाल एकूण १००% लागला असून या निकालामध्ये ०६ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर प्रथम श्रेणीत ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान दत्तप्रसाद अर्जुन मुंडे याने ७९.४० टक्के गुण प्राप्त करून पटकावला आहे व विजय उमाकांत फड ७९% व स्वप्निल अशोक सूर्यवंशी ७८.६० % गुण घेऊन द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. शाळेमध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व विषयाच्या जादा तासिका, साप्ताहिक, मासिक व सराव परीक्षांचा परिणाम म्हणून या निकालाचे सातत्य राखण्यात विद्यार्थ्यांना यश आले असल्याचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी सांगितले.



गेल्या २३ वर्षापासून मानव विकास मूकबधिर विद्यालय आपल्या निकालाची यशस्वी परंपरा विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन जोपासत आहे. मूकबधिर विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख दिलीप साठे , डी. बी. शिंदे, एन. व्ही. बारस्कर, श्रीमती भालकीकर, भालचंद्र नांदुरकर आदींनी मार्गदर्शन केले. या निकालाबद्दल संस्थेचे सचिव ,राजकिशोर मोदी, अध्यक्ष ,भूषण मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मेश्राम मॅडम, वैसाका मार्गदर्शक अंकुशराव नखाते , संस्थेचे मार्गदर्शक प्रा . व्ही . बी. चव्हाण, डॉ. डी एच.थोरात, प्राचार्य बी.आय.खडकभावी, दिनकर जोशी , सी. व्ही. गायकवाड सर तसेच शाळेचे मुख्याध्यापक आनंद टाकळकर, त्याचबरोबर मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.के. चव्हाण , अपंग विद्यालयाचे मुख्याध्यापक इंद्रकुमार लोढा, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायक मुंजे, घाटनागनाथ प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजली जोशी आदींनी सर्व विद्यार्थी, पालक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# शारदा विद्या मंदिर दैठण या शाळेने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी १००% निकालाची परंपरा कायम



गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर यांनी फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा, दहावीचा निकाल घोषित केलेला आहे. त्यामध्ये गेवराई तालुक्यातील शारदा विद्या मंदिर दैठण या शाळेतुन प्रथम कु. पंडित हर्षदा राजेंद्र ९१.२०% कु.पंडित मेघा संजय ९०.४०% कु. पराड स्नेहल देविदास ९०.२०% आणि कु.जामकर संजना विजय ९०.२० % या विद्यार्थीनिंनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक येण्याचा मान पटकावला असून एकूण ५८ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते त्यापैकी ५८ ही विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, शाळेचा निकाल १०० % लागला आहे . तर विशेष प्राविन्याने ३३ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत २३ व द्वितीय श्रेणीत २ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. शिवाजीराव (दादा) पंडित, अध्यक्ष मा. अमरसिंह पंडित, सचिव मा. जयसिंह पंडित, आमदार मा. विजयसिंह पंडित, युवा नेतृत्व तथा शारदा स्पोर्ट अकॅडमी प्रमुख मा. रणविर (काका) पंडित, मा. पृथ्वीदादा पंडित, दैठण गावचे सरपंच प्रताप भैय्या पंडित, उपसरपंच अशोक भाऊ पंडित, चंदू काका पंडित, बप्पासाहेब पंडित, ज्येष्ठ मार्गदर्शक अमृत डावकर सर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोरकर सर, गोगुले सर शारदा शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक सय्यद सर व सर्व शिक्षक वृंद तसेच व गावकरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर यांनी फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा, दहावीचा निकाल घोषित केलेला आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ छत्रपती संभाजीनगर यांनी फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा, दहावीचा निकाल घोषित केलेला आहे.



# पाटोदा (म) येथे आयोजित छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई / सालेम पठाण
(दै. महाभारत)

अंबाजोगाई तालुक्यातील पाटोदा (म) या ठिकाणी दि. १३/०५/२०२५ मंगळवार रोजी सकाळी ९ ते ४ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर घेण्यात आला असता नागरिकांचा या वेळी उतस्फूर्त प्रतिसाद दिसून आला. पाटोदा म. येथील जिल्हा परिषद शाळा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर मंडळ पाटोदा तर्फे सकाळी ९:०० ते ४:०० वा. घेण्यात आलेल्या शिबिरात शेतकरी बांधवांच्या समस्या जसे की सातबारा दुरुस्ती , शेतरस्ते बांध, शिवरस्ता, पांदण रस्ता, शेतकरी वोळखपत्र, पी. एम. किसान तसेच निराधार पगारी डी . बी. टी (केवासी), लाभार्थी यांनी आधार कार्ड व लिंक मोबाईल तसेच बँक पासबुक आवश्यक का आहे आदी विषयाबाबत तसेच जिवंत सातबारा अंतर्गत वारस नोंदी घेणे, पोखरा योजनेची माहिती या करिता शिबीर आयोजित करण्यात आला होता.

या शिबरास दिपक वजाळे (उपविभागीय अधिकारी), सचिन देशपांडे (नायब तहसीलदार) अंबाजोगाई, पाटोड्याच्या सरपंच सौ.त्रिवेणी दशरथराव उगले,मंडळ अधिकारी श्रीमती देशमुख, पि. के, कृ.षी.उ.बा.स.संचालक बाळासाहेब देशमुख, व्ही. बी बनसोडे (ग्राम महसूल अधिकारी),श्रीमती सय्यद (ग्राम महसूल अधिकारी ), श्रीमती नागीले (ग्राम महसूल अधिकारी) , श्री एस. एम. चाटे(ग्राम महसूल अधिकारी) , व्हि. डी. कुटवाडे (ग्राम महसूल अधिकारी) , अविनाश उगले, समीर पठाण ग्रामस्थ व परीसरातील १४ गावातील नागरिक आप आपल्या समस्या चे निराकरण करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजित करण्यात आलेल्या शिबिरातस गावातील ग्रामस्थांचा व परिसरातील नागरिकांचा प्रतिसाद दिसून आला.

# शालांत प्रमाणपत्र परीक्षेत कुलस्वामिनी भंडारे ९३.६०% गुण घेऊन उत्तीर्ण

माजलगाव : अमर साळवे
(दै. महाभारत)

नुकताच माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनी कु. कुलस्वामिनी शिवशंकर भंडारे हिने ५०० पैकी ४६५ गुण घेऊन म्हणजेच ९३.६०% गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. या मिळवलेल्या यशाबद्दल कु कुलस्वामिनी भंडारे हिचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर,



उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे सर, सदाशिव ढगे सर, कमलाकर झोडगे सर, परमेश्वर आदमाने सर, दहावी प्रमुख नरेंद्र कोष्टगावकर, राहुल नाईक, कार्यालय प्रमुख संतोष लवडकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल चा ८८%निकाल

फुलंब्री/ सुधाकर जेठे
(दैनिक महाभारत)

दरेगाव खुलताबाद तालुक्यातील महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व जुनिअर कॉलेज. फेब्रुवारी २०२५ मध्ये राबविण्यात आलेल्या कॉपीमुक्त अभियान अंतर्गत घेण्यात आलेल्या इयत्ता १० वी परीक्षेचा निकाल ८८% लागला. शाळेतून प्रथम येण्याचा मान १.सागर अण्णासाहेब गायकवाड प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला (७९.६०%) द्वितीय सिद्धी बाळू जाधव (७८.६०%) तृतीय प्रसाद विजय आहेवाड (७८.००%) या सर्वांचे स्वराज्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ संजय गायकवाड संस्थेचे उपाध्यक्ष माननीय दिगंबर गाडेकर संस्थेच्या सचिव शांता बाबुराव भोसले यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. आमच्या विद्यालयाचे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करतात आत्मविश्वास जिद्द चिकाटी या प्रेरणेतून मुलं अभ्यास करतात. स्पर्धा परीक्षेमध्ये कला शाखेतून उत्तीर्ण होण्याची प्रमाण जास्त आहे. आणि या विद्यालयात सखोल असे मार्गदर्शन तज्ञ शिक्षक वेळोवेळी मार्गदर्शन करतात. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश वेताळ व सर्व प्राध्यापक सर्व शिक्षक यांनी सुद्धा अभिनंदन केले आहे .नेहमीप्रमाणेच संस्थेचे अध्यक्ष मुलांनमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी वरिष्ठ पातळीवरील अधिकारी मार्गदर्शन करतात स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करायची त्याचे स्वतःचे अनुभव या अधिकाऱ्यांनी मुलांना सखोल असं मार्गदर्शन करतात म्हणून आमच्या महाराजा सयाजीराव गायकवाड ज्युनिअर कॉलेजमधून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होत आहे.

दरेगाव, पाडळी, माळेगाव, येथील ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच सोसायटीचे चेअरमन ग्रामपंचायत सदस्य व गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# हिमायतनगर पोलीस स्थानकात जमा असलेली वाहने मालकांनी कागदपत्रे आणून घेऊन जावीत – पो. नि. भगत

अंगद सुरोशे / हिमायतनगर
(दै.महाभारत)

शहरातील पोलीस ठाण्यात गेल्या अनेक महिन्यांपासून बेवारस, अपघातातील आढळलेले अनेक वाहने यात चार चाकी, तीन चाकी व दोन चाकी वाहने ज्यांची ज्यांची असेल त्यांनी आप आपल्या गाडीचे कागदपत्रे व पुरावे आणून घेऊन जावी, अन्यथा येत्या तीन दिवसात त्याची लिलाव प्रक्रिया करण्यात येईल, अशी माहिती हिमायतनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी दिली आहे.

हिमायतनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काळात अनेक अपघातातील तसेच काही ठिकाणी बेवारस स्थितीत आढळेली वाहने पोलीस स्थानकात जमा करण्यात आली आहेत अशा अनेक महिन्यांपासून ही वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात ठेवण्यात आली आहे. वारंवार अनेकांना सांगून सूचना देऊन आपली वाहने घेऊन जात नाहीत. तसेच ज्यांची वाहने आहेत. त्यांनी आपल्या गाडीचे कागदपत्रे व इतर पुरावे असेल तर आणून आपली वाहने घेऊन



जावीत, अन्यथा येत्या तीन दिवसात नंतर या वाहनाचा कायदेशीर लिलाव प्रक्रिया करण्यात येईल, अशी माहिती हिमायतनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमोल भगत यांनी दिली आहे.

# श्री शिव छत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स पुणे बालेवाडी येथे झालेल्या सब ज्युनियर कराटे अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण पदक!




कल्याण / संजय कांबळे (दै.महाभारत)

नुकत्याच श्री शिव छत्रपति स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स पुणे बालेवाड़ी येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य कॉडेट जूनियर आणि सब जूनियर कराटे अजिंक्यपद २०२५ –स्पर्धेत सबजूनियर या गटातून ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर मधील चि. अदिति नायर याला –४० किलो वजन गटात सुवर्ण पदक मिळाले व चि. प्रजक्ता साल्वे याला ३० किलो वजन गटात रोप्या पदक मिळाले .यामुळे यांचे सर्व स्थरातून अभिनंदन होत आहे. पुणे बालेवाडी येथील श्री शिव छत्रपति स्पोर्ट्स कॉँम्प्लेक्स मध्ये कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रमधील सर्व जिल्ह्यातील कराटे खेळाडूंनी सहभाग दर्शवीला होता.ही स्पर्धा श्री शिव छत्रपति स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स पुणे बाड़ेवाड़ी येथे संपन्न झाली.या स्पर्धा कराटे- दो असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष शिहान सल्लाउद्दीन अन्सारी व सचिव शिहान संदीप गाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या.विजयी अदिति नायर व प्रजक्ता साल्वे कल्याण मधील सेंसई विवेक शुक्ला यांचे मार्गदर्शन लाभले होते.त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्थरातून व परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# आमदार मंदाताई म्हात्रे यांनी नवी मुंबई भाजपाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांचे केले अभिनंदन

नवी मुंबई / संतोष वाव्हळ
(दै.महाभारत)

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशातील संघटनात्मक जिल्ह्यांकरिता दि. १३ मे २०२५ रोजी जिल्हाध्यक्षांची घोषणा करण्यात आली. यावेळी नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष पदी डॉ. राजेश पाटील यांची नियुक्ती झाली असून आमदार मंदाताई म्हात्रे यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच नवनियुक्त झालेले उच्चशिक्षित असलेले डॉ. राजेश पाटील हे ओळखले जातात. यापूर्वी डॉ. राजेश पाटील यांनी शेतकरी समाजासाठी व प्रकल्पग्रस्तांसाठी ते कायम लढत आलेले आहेत. तसेच शिक्षण संस्था, कॉलेज शाळा यांच्या माध्यमातून नागरिकांना रोजगार मिळावा म्हणून अनेक उपक्रम डॉ. राजेश पाटील यांच्या माध्यमातून राबविले गेले. महिलांसाठी महिला मेळावे, महिला बचत गटाच्या मध्यातून उद्योग धंदे



उपलब्ध करून दिले. असे गेली १० वर्षे भारतीय जनता पार्टीमध्ये सक्रीय कार्य करीत आहेत. या सर्व कार्यांची दखल घेत भारतीय जनता पार्टीने ओबीसी व आगरी समाजाचे नेतृत्व म्हणून डॉ. राजेश पाटील यांची जिल्हाध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच डॉ. राजेश पाटील स्वत: प्रत्येक मंडळामध्ये जाऊन मंडळाचा अभ्यास करून संघटना मजबूत करण्याचे कार्य करतील अशी आशा आहे. नवी मुंबईचा इतिहास, भूगोल व तसेच सांस्कृतिक जाण असलेले व्यक्तिमत्व म्हणून राजेश पाटील यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या नियुक्तीने जुन्या भाजपातील कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच डॉ. राजेश पाटील यांनी आपल्या राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकुशलतेमुळे नवी मुंबईत विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे पक्षाच्या स्थानिक पातळीवरील कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास आमदार मंदाताई म्हात्रे यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समवेत माजी पोलीस पाटील दिलीप पाटील, प्रमोद घरत, बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, सीवूड्स-करावे मंडळ अध्यक्ष सुधीर जाधव, नेरूळ (पूर्व) मंडळ अध्यक्ष कुणाल महाडिक, नेरूळ (पश्चिम) मंडळ अध्यक्ष भास्कर यमगर, सानपाडा-जुईनगर मंडळ अध्यक्ष सुनिल कुरकुटे, तुर्भे मंडळ अध्यक्ष पंकज आंबीरकर, वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे तसेच असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# निम्नपैनगंगा प्रकल्पाअंतर्गत खंबाळा बनणार पुनर्वसनाचा रोल मॉडेल

माहूर (दैनिक महाभारत)

खंबाळा गावचे पुनर्वसन सर्वप्रथम लवकरच सरू होणार १३/०५/२०२५ रोजी पुनर्वसन संबंधित चर्चा करण्यासाठी येवतमाळ पाटबंधारे प्रकल्पातील अधीक्षक अभियंता श्री सुनील चौधरी साहेब यांनी बोलवलं येक शिष्टमंडळ निम्नपैंगनाग प्रकल्प अंतर्गत पहिल्या टप्प्यात १२ गावाचे पुनर्वसन आहे त्यात मराठवाडामधील फक्त ०३ गावचे पुनर्वसन होणार १)खंबाळा२)पाथरी३शीख धनोरा सर्वप्रथम खांबाळा गाव रोल मॉडेल कस बनवता येईल या साठी खांबाला गावच स्ट्रक्चरल आराखडा तयार करणे सुरू आहे- आता पुढची प्रोसेस लवकरच सुरू



करण्यात येईल, हे करताना शेतकऱ्याना जास्तीत जास्त कसा फायदा मिळेल व कोणाचेही नुकसान होणार नाही,या साठी निम्नपैनगंगा प्रकल्पातील सगळे अधिकारी प्रयत्न करतील अशी शाश्वती श्री चौधरी सर यांनी दिली राहिलेली शेती चे मोजमाप झाले असून हस्तांतरित करन्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार व त्याबाबत संबंधित शेतकरासोबत चर्चा करून रेडीरेक्नर नुसार दर निचित करण्यात येईल, खांबाळा गावातील रहिवाशी पण शेतजमीन बोथ,टेंभी,पाथरी भागात असेल तर ती पण शेतजमीन हस्तांतरित करयात येईल पुनर्वसना नंतर प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र लवकर प्राप्त करून देनार जेणेकरून तरुणांना नोकरीसाठी फायदा होईल विदर्भ व मराठवाडा शेत्रातील पुनर्वसन ला गती देणासाठी पुनर्वसन समिती तयार करनार व कामाला गती देणार व शेतकऱ्यांचे प्रश्न लवकर सुटणार येवतमाळ ला बोलवले गेलेल शिष्टमंडळ १)श्री विठ्ठल नायक २)डॉ सचिन पवार ३)डॉ पिंटू चव्हाण ४)एडव्होकेट धीरज बनसोड ५)श्री रमेश महाजन ६)श्री प्रशांत चव्हाण या प्रकल्पामुळे मराठवाडा व विदर्भातील लोकांना नवसंजीवनी प्राप्त होईल व पाण्याचा कायमचा प्रश्न मिटेल या साठी सगळ्यां शेतकऱ्यांनी सोबत राहून सहकार्य करावे असे भावनात्मक मत श्री चौधरी साहेब यांनी व्यक्त केले

## दहावी परिक्षेत श्रद्धा माने हिचे यश



जालना/प्रतिनिधी
(दै.महाभारत)

राज्य माध्यमिक व उच्च विभागाच्या वतीने मार्च मधे घेण्यात आलेल्या दहावी परिक्षेचा निकाल दिनांक १३ मे रोजी जाहीर झाला.परतुर तालुक्यातील सेलगाव येथील श्रद्धा रामकिसन माने यांनी दहावी मधे ९७.६०% घेऊन घवघवीत यश मिळवले त्याबद्दल श्रद्धा माने हिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# दाखल्यांच्या शुल्कात दुप्पट वाढ सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला बसणार फटका

ब्रह्मपुरी/प्रतिनिधी
(दै.महाभारत)

ऑनलाईन सेवा केंद्र मधून नागरिकांना दैनंदिन जीवनात लागणारे सर्व प्रकारचे दाखले प्रमाणपत्रासाठी आता अधिक रक्कम मोजावी लागणार आहेत आपले सरकार या पोर्टल द्वारे दिल्या जाणाऱ्या सर्व सेवांचे शुल्क वाढ करण्यात आले असून विविध प्रकारच्या दाखल्याच्या शुल्कात शासनाने दुप्पट वाढ केली आहे त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला फटका बसणार आहे .शाळा महाविद्यालय शासकीय योजना आदी महत्त्वाच्या बाबीसाठी नागरिक व विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड,रेशन कार्ड, प्रतिज्ञापत्र नान क्रिमिलेयर जात पडताळणी, रहिवाशी आधी दाखल्यांची गरज भासते वरील दाखले, प्राप्त करण्यासाठी शासनाने सेतू केंद्राची निर्मिती केली आहे आता बारावीचा निकाल लागला असून कालच दहावीचा निकाल लागला असुन निकाल लागलेले विविध ठिकाणी प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना दाखल्यांची गरज भासते यावेळी.

विद्यार्थी दाखले काढण्यासाठी सेतू केंद्रावर एकच गर्दी करतात मात्र त्यांना आता अधिकच्या शुल्क देऊन दाखले मिळवावे लागणार आहे आधी ३४ ते १०० रुपयापासून दाखले प्राप्त करण्यास शुल्क होते त्यामुळे नागरिकांच्या खिशाला परवडेल एवढे शुल्क आकारले जात होते परंतु काही दिवसांपूर्वी प्रशासनाने दाखल्यांच्या शुल्कात वाढ केली आहे ६९ रुपये ते १२८ रुपयापर्यंत वाढ करण्यात आली आहे उत्पन्न नॉन क्रिमीलेअर व इतर दाखल्यांसाठी नागरिकांना ६९ रुपये तर जातीच्या प्रमाणपत्रासाठी १२८ रुपये मोजावे लागणार आहे. या दाखल्यासाठी तर दुप्पट शुल्क आकारणी केल्याने सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या खिशाला चाप बसला आहे.शासकीय दाखल्यांसाठी सेतू केंद्रात प्रशासनाने नमूद करून केलेले शुल्क भरून अर्ज करावा लागतो गरीब विद्यार्थ्यांना व नागरिकांना वाढीव शुल्क परवडणारे नाही परंतु आवश्यक दाखले मिळावेत यासाठी गरजूंना वाढीव शुल्क भरावे लागत आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना जास्तीचा भुर्दंड सोसावा लागतो.

# पंचायतन मंदिराचा तृतीय वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा

## सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

नवी मुंबई / संतोष वाव्हळ
(दै.महाभारत)

जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या नढाळ येथील श्रीक्षेत्र पंचायतन मंदिराचा तृतीय वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. पनवेलचे मा.आदर्श नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांच्या संकल्पनेतून जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून पंचायतन मंदिर, नढाळ वाडी, चौक येथे १३ मे २०२२ रोजी या मंदिरांचा भव्यदिव्य असा प्राणप्रतिष्ठा सोहळा करून स्थापना करण्यात आली होती. श्री.मयुरेश्वर गणेश, संकटमोचन श्री.हनुमान, श्री.साईबाबा, श्री.भवानी माता आणि नढाळेश्वर महादेव या पाच मंदीरांचे भव्य-दिव्य असे आध्यात्मिक संकुल उभारण्यात आले आहे. यावर्षी मंदिराचा तिसरा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात हरिपाठ, श्रीं ची पालखी मिरवणूक दिंडी सोहळा, संगीत भजन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष नामदार श्री.अण्णासाहेब बनसोडे, लोकनेते माजी खासदार श्री रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल पंचायत समिती माजी सभापती काशिनाथ पाटील, कृ.ऊ.बा.स. समिती सभापती नारायण शेठ घरत,



भाजपा ज्येष्ठ नेते नंदकुमार पटवर्धन, खालापूर नगराध्यक्ष सौ.शिवानी जंगम, शेकाप खालापूर तालुका चिटणीस संतोष जंगम, माजी नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पायी दिंडी चालत जाणाऱ्या सर्व भक्तांसाठी सभागृहात राहण्याची मोफत सेवा देण्यात येते. भक्तांसाठी अत्यल्प दरात भक्त निवासाची व्यवस्था या ठिकाणी आहे. दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांना मोफत चहा-पाणी ही अन्न सेवा संस्थेच्या माध्यमातून देण्यात येते. सांप्रदायिक, भजन कीर्तन कार्यक्रमासाठी मोफत सभागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. शैक्षणिक सेवेच्या दृष्टीने परिसरातील हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मीडियम स्कूल मधून अत्यल्प दरात इंग्रजी माध्यमाची शिक्षण सेवा देण्यात येते. शाळेमध्ये पालक नसणाऱ्या आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम नसणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण सेवा आणि आवश्यक ते सहकार्य अशाप्रकारे विविध सुविधा श्री क्षेत्र पंचायतन मंदिराच्या परिसरातून देण्यात येतात.

– प्रितम जनार्दन म्हात्रे,

# छत्रपती संभाजीराजेंचे विचार आत्मसात करुन त्यांच्यासारखे वागावे – श्रीमती कांबळे

## गेवराई पंचायत समितीत छत्रपती संभाजीराजेंची जयंती साजरी

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

छत्रपती संभाजी महाराज हे शौर्य, विद्वत्ता आणि स्वाभिमानाचे सर्वोच्च प्रतीक होते. प्रत्येकाने छत्रपती संभाजी महाराजांचे विचार आत्मसात करुन त्यांच्यासारखे वागावे त्यांनी दाखवलेला स्वाभिमान आणि देशासाठी केलेला त्याग, आपल्याला प्रेरणा देतो आणि समाजाला चांगले बनण्यास मदत करतो. हा केवळ उपदेश नसून, जीवन जगण्याचा एक प्रेरणादायी मंत्र आहे. असे प्रतिपादन गटविकास अधिकारी श्रीमती मीना कांबळे यांनी व्यक्त करुन एका छोट्याशा वाक्यात दिलेला संदेश आहे.

गेवराई येथील पंचायत समिती, कार्यालयात बुधवार दि.१४ मे रोजी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम छत्रपती संभाजी राजेंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. दरम्यान यावेळी त्यानी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सहा, गटविकास अधिकारी संजय गायकवाड , सुनील थोरात, लेखा विभागाचे सय्यद, नरेगा विभागाचे एपिओ अरविंद माळदकर, सचिन गिरी , पत्रकार वैजीनाथ जाधव , देशमुख, तळेकर, सचिन



पंडित , यश इनकर, धनंजय पंडित, विशाल पांढरे, रोकडे सुंदर , उत्तम तौर, अनेराव, ओएस नायगावकर सह आदी कर्मचारी उपस्थित होते.

पुढे बोलताना गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे म्हणाल्या की , छत्रपती संभाजी महाराज हे शौर्य, विद्वत्ता आणि स्वाभिमानाचे सर्वोच्च प्रतीक होते. आपणही त्यांच्यासारखं निडर, कर्तव्यनिष्ठ, आणि नीतिमान व्हावं व त्यानुसार वागावं असा उद्देश त्यांनी स्पष्ट मांडला. धैर्याने जगायला शिका, अन्यायाला झुकवायला शिका – हाच खरा संभाजीराजांचा मार्ग असल्याचे श्रीमती कांबळे यांनी सांगितले. एपीओ माळवदकर यांनी देखील छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन कार्याची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

# येवला येथील मुक्तीभूमी ग्रंथालयास दान पारमिता फाउंडेशनच्या वतीने ग्रंथदान



## संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय कळंबचा दहावीचा १००% निकाल

तुळजापूर/अजित चव्हाण
(दै. महाभारत)

कळंब:- धाराशिव जिल्ह्यात मुकबधिर प्रवर्गातून प्रथम क्रमांक मिळवत, तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगांव संचलित संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय कळंब जि.धाराशिव येथील इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे. विशेष प्राविण्य ०२, प्रथम श्रेणीत ०६, द्वितीय श्रेणीमध्ये ०१ असून निकाल पुढील प्रमाणे आहे. लखन व्यंकट अवधूते - ७५.६०% प्रथम, कु.स्नेहा समाधान कोळी - ७५.२०% द्वितीय, गणेश सुधाकर वनवे - ७१.६०% तृतीय, विष्णू श्रीहरी वायबसे - ६९.८०%, जयराम व्यंकट अवधूते- ६०.८०%, सुरज प्रताप वाघमारे -६९.६०%, कु.तेजस्विनी प्रदीप चवरे- ६८.००%, सुमित शिवाजी इंगळे- ६४.६०%, कृष्णा महादेव शिंदे - ५७.६०%, या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव सन्माननीय शहाजी चव्हाण साहेब व शाळेचे मुख्याध्यापक बालाजी जाधवर विशेष शिक्षक आश्रुबा कोठावळे, श्रीमती गुंड सुनीता, श्रीमती सुनंदा गायकवाड, गणेश फरताडे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै. महाभारत)

नाशिक-: दान पारमिता फाउंडेशन व डॉ.लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५६९ वी जयंती (वैशाख पौर्णिमा) दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बौद्ध धम्मलिपी व बौद्ध लेणी अभ्यास,प्रशिक्षण कार्य करणाऱ्या दान परामिता फाउंडेशन नाशिक व लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान नाशिक महाराष्ट्र यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास इंदिरा नगर नाशिक विभागाच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या हस्ते दान पारामिता फाउंडेशन नाशिकच्या वतीने ३५० स्पर्धा परीक्षा उपयुक्त ग्रंथ येवला येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मुक्तीभूमी सार्वजनिक वाचनालय तथा राष्ट्रीय महाकवी वामनदादा कर्डक मुक्ती भूमी अभ्यासिकेस ग्रंथदान करण्यात आले.येवला शहर व तालुक्यातील शेतकरी,कामगार,कष्टकरी व समाजातील सर्व घटकांच्या मुलामुलींसाठी हे वाचनालय गेल्या सहा वर्षांपासून मोफत उपलब्ध करून दिले असून अनेक विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले आहे.

दुरदर्शन सह्याद्री वाहिनी ब्युरो चीफ नाशिक,भगवान पगारे,मोहनभाऊ आढांगळे,समता सैनिक दल, अनिल-धम्मकाया फाउंडेशन,,अनिल गायकवाड,माहिती अधिकार कायदा जनजागृती अभियान , ज्योतीताई गायकवाड,मर्दानी फाउंडेशन, मिलिंद



बनसोडे चारिका फाउंडेशन,माधवीताई शिरसाठ धम्म नायिका संघ नाशिकरोड,रोहिणीताई जाधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टडी कोर्स संचालिका,नाशिक उपस्थित होते , सर्व मान्यवरांच्या हस्ते बुद्धरूपास फुले वाहण्यात आली, सूत्रसंचालन संतोष आंभोरे ह्यांनी केले, प्रस्ताविक संस्थेचे अध्यक्ष सुनील खरे ह्यांनी केले, ह्या प्रसंगी समकालीनतेचा लोकशाहीर प्रा.शरद शेजवळ,इंडीयन आयडॉल मराठीच्या सुप्रसिद्ध गायिका आम्रपाली पगारे प्रस्तुत बुद्ध-आंबेडकरी सामाजिक प्रबोधन गीतांची मैफिल सादर झाली सादरकर्ते लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठान कलापथक आंबेडकरी शाहिरी जलसा पाथर्डी फाटा नाशिक येथे सादर करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजक सुनील खरे,संतोष आंभोरे, प्रवीण जाधव, राहुल बागले, राज ढाले, हेमंत मोहोड, बापू निकम, दिनकर निकाळजे, तेजस बारसागडे, विशेष सहकार्य अनिल गायकवाड, भगवान पगारे,अनिल बागुल, दिनेश गायकवाड, मिलिंद बनसोडे,सह आयोजक संस्था चारिका फाऊंडेशन,मर्दानी फाऊंडेशन, धम्मकाया फाऊंडेशन,संघमित्रा बहुउद्देशीय संस्था इत्यादींनी प्रयत्न केले.कार्यक्रमास नाशिक शहर व परिसरातील बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंगरूळपीर तालुक्यातून कला शाखेचा विद्यार्थी भागीरथ अवगण प्रथम

दै.माहाभारत / मंगरूळपीर

मंगरूळपीर : फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये झालेल्या एच. एस. सी. परीक्षेत श्री वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक नाईक वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक गुण संपादित करीत महाविद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली.या महाविद्यालयातील विद्यार्थी भगीरथ दिलीप अवगण याने कला शाखेमध्ये ६०० पैकी ५४० गुण संपादित करून मंगरूळपीर तालुक्यामध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. मागील तीन वर्षापासून या या महाविद्यालयातील विद्यार्थी कला शाखेमध्ये ९०? किंवा ९०? पेक्षा अधिक गुण मिळवून मंगरूळपीर तालुक्यामधून गुणानुक्रमे प्रथम येत आहे हे विशेष आणि उल्लेखनीय. फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये झालेल्या एच.एस.सी. परीक्षेत या महाविद्यालयातील कला शाखेमधून एकूण प्रविष्ट ८५ विद्यार्थ्यांपैकी ४ विद्यार्थी प्राविण्यश्रेणी, १४ विद्यार्थी प्रथम श्रेणी, ४७ विद्यार्थी द्वितीय श्रेणी तर १३ विद्यार्थी तृतीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. कला शाखेची निकालाची टक्केवारी ८३.५२

अशी आहे. या शाखे मधून भगीरथ दिलीप अवगन ९०. टक्के यश बाळू भगत ८५.००टक्के सुरज सुधाकर जाधव ८४.३३ टक्के गुण मिळवून महाविद्यालयामधून अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय आले आहे. वाणिज्य शाखेमधून परीक्षेला प्रविष्ट एकूण ४९ विद्यार्थ्यांपैकी सर्व ४९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन वाणिज्य शाखेचा मागील काही वर्षापासूनचा १००? निकालाची परंपरा महाविद्यालयाने कायम ठेवली. या ४९ वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांपैकी ६ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीमध्ये, १९ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये, १९ विद्यार्थी द्वितीय श्रेणी मध्ये, तर ५ विद्यार्थी तृतीय श्रेणी मध्ये उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेमधून कु. निकिता राजेश जाधव आणि कु. साक्षी गणेश वार्डेकर या दोन्ही विद्यार्थिनींनी ६०० पैकी ४९४ असे सारखे गुण मिळवून वाणिज्य शाखेमधून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला. त्यांच्या गुणांची टक्केवारी ८२.३३ अशी आहे. तर कु. कोमल सुनील सावळे ८२.०० आणि गणेश संजय पवार ८०.६७ गुण संपादन करीत वाणिज्य शाखेमधून अनुक्रमे द्वितीय व तृतीय आले आहे. संस्थेचे अध्यक्ष आ. अ. राठोड यांनी दर्जा व गुणवत्ता पूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांनादेण्याचाघेतलेला वसा, मानद कार्यकारी अधिकारी, डॉ. एल. के. करांगळे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस. एम.



वडगुले यांचे मार्गदर्शन व महाविद्यालयीन प्राध्यापकवृंद यांचे नियोजनबद्ध व कौशल्यपूर्ण अध्यापन यामुळे या यशाचा मार्ग सुकर झाला असे महाविद्यालयाचे वतीने सांगण्यात आले.सर्व यशस्वी व तसेच गुणवंत विद्यार्थी यांचे संस्थेचे अध्यक्ष, सचिव, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक करीत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसंबंधी मार्गदर्शन केले.

## एजंट गायब झाल्याने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले

श्रीगोंदा/विजय मांडे
(दै.महाभारत)

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक परतावा मिळण्याच्या आशेने श्रीगोंदा तालुक्यात कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. त्यासाठी गावागावांत एजंट कार्यरत असून अलिकडच्या महिनाभरात गुंतवणूक करून घणारे एजंटच पसार होऊन फरार झाल्याने कोट्यवधी रुपयांचा लोकांना गंडा बसल्याची शक्यता आहे.त्यात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या अधिक असल्याचे बोलले जात आहे. फसवणूक झाल्याबाबत तक्रार दाखल झालेली नाही, फसवणूक झाली असेल तर तक्रार करावी असे पोलिस विभागाने सांगितले आहे.

शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगली रक्कम मिळते या आशेने श्रीगोंदा तालुक्यात साधारण तीन वर्षांपूर्वी काही गावांत एजंटच्या माध्यमातून शेअर बाजारात गुंतवणूक सुरू झाली. काही कालावधीतच एक लाख रुपयांना १० ते १२ टक्के म्हणजेच १००० ते १२०० व्याज मिळू लागले.त्यातून एजंटगिरी करणारे यांना ३ लाख रुपये महिना मिळू लागला त्यात त्यांचे अलिशान राहणे, आणि ज्यांनी सुरुवातीला गुंतवणूक करून पैसे परत मिळाल्याने गुंतवणूक करणाऱ्यांच्यात वाढ झाली.शेतकरी, कामगार, शिक्षक,महिला, बचतगटांतील सदस्य, नोकरदार अशा विविध क्षेत्रातील लोकांनी यात गुंतवणूक केली.

सविस्तर वृत्त असे की,मिळालेल्या माहितीनुसार एकट्या श्रीगोंदा तालुक्यात १०० च्या जवळपास एजंट असून १० हजारांपेक्षा अधिक लोकांनी ८०० ते ९०० कोटींची गुंतवणूक केल्याचा अंदाज आहे.यात ग्रामीण भागातील शेतकरी व सुशिक्षित बेरोजगार यांची संख्या अधिक असल्याचे बोलले जात आहे. रक्कम गुंतवणूक केल्याच्या पावत्या दिलेल्या नाहीत.शेअर बाजारात एजंट म्हणून काम करणाऱ्यांनी आलिशान गाड्या, प्लॉट खरेदी अशी कोट्यवधी रुपयांची मालमत्ता खरेदी केली असल्याचे लोकांचे म्हणणे आहे.

अलिकडच्या महिनाभरात गुंतवणूक कालावधी संपल्यावर लोकांचे पैसे देण्याच्या काळात काही एजंट गायब झाले आहेत. परदेशातही पैसे गेल्याचे सांगितले जात आहे. श्रीगोंदा तालुक्यातून असे सात ते आठ एजंट सध्या गायब झाल्याचे सांगितले जात आहे. श्रीगोंदा तालुक्यात शेअर मार्केटचा विळखा बसला असून एजंट गायब होत असल्याने मोठा आर्थिक फटका बसला आहे.

मात्र पोलिसांकडे याबाबत तक्रारी नसल्याने किती लोकांची फसवणूक झाली, किती रुपयांचा फटका बसला याबाबत मात्र अधिकृत माहिती समजू शकत नाही. मात्र काही एजंट गायब झाल्याने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना मंत्रिमंडळातून निलंबित करा

### रिपाई (डि एस ) महाराष्ट्र प्रदेशध्यक्ष कैलासभाई पगारे यांनी राज्यपालाकडे निवेदनाद्वारे मागणी

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै.महाभारत)

नाशिक-: रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने दिंडोरी तहसीलदार यांच्या मार्फत माहामहिम राज्यपाल यांना निवेदन देण्यात आलं त्यात असे म्हणण्यात आले कि अजित पवार जेव्हा, जेव्हा अर्थमंत्री असतात तेव्हा ते नेहमीच समाजकल्याण खात्याचा निधी अन्यत्र वर्ग करतात यापूर्वी सुद्धा समाजकल्याण चा निधी त्यांनी वारकऱ्या साठी वळवला होता आताही समाजकल्याण चा ४१० कोटींचा तसेच आदिवासी विभागाचा ३३६ कोटींचा निधी लाडक्या बहिणी साठी वापरला राज्यात अनुसूचित जातींची १२% लोकसंख्या असताना त्याप्रमाणात सदर विभागाला ८५००० कोटी चालू बजेट नुसार देने अपेक्षित असताना तुटपुंजा ३००० कोटी रुपये निधी देऊन आधीच मागासवर्गाच्या तोंडाला पाने पुसणाऱ्या अजित पवार यांनी आता निधी इतरत्र वर्ग करून अनसूचित जाती, जमातीच्या लोकांवर अन्याय केला आहे संविधानाच्या आर्टिकल ३८ प्रमाणे



मागासवर्गीय लोकांचं जीवनमान उंचावण्यासाठी असलेला निधी दुसरीकडे खर्च करून त्यांना विकासापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सध्याचं फडणवीस सरकार करत आहे विद्यार्थ्यांच्या शिक्षवृत्ती साठी निधी नाही, स्वाधार निधीसाठी पैसा नाही असे असताना जाणीवपूर्वक मागासवर्गीयांचा हक्क हिरावून घेणे त्यांना प्रगतीपासून वंचित ठेवणे हा एकप्रकारे गुन्हाच असून त्यांच्यावर अनु. जाती / जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ चे कलम ३(१) ल नुसार गुन्हा नोंद करावा तसेच मंत्री पदाची शपथ घेताना कोणाशीही आकसबुद्धीने वागणार नाही, भेदभाव करणार नाहीसंविधानाला अनुसरून कार्य करेल अशी शपथ घेणाऱ्या अजित पवारांची कृती संविधान विरोधी असून त्यांना मंत्रिमंडळातून त्वरित निष्काशीत करावं अशी मागणी राज्यपालाकडे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलाभाई पगारे यांनी दिंडोरी तहसीलदार याच्यामार्फत केली त्यावेळी निवेदन देतांना उत्तरमहाराष्ट्र नेते अरुण गांगुर्डे, युवा नेते आर्यन पगारे, ओम जाधव, शुभम चव्हाण इत्यादी कार्यकर्ते होते

## महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना संपर्क कार्यालय उद्घाटन कामगारांचे हक्क आणि त्यांच्या समस्यांवर उपाय काढू – अमरसिंह पंडित



बीड / नितीन जोगदंड
(दै.महाभारत)

महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना बीड संपर्क कार्यालय शाहूनगर बीड येथे दिनांक १४ मे २०२५ रोजी उद्घाटन म्हणून राष्ट्रवादी पक्षाचे सरचिटणीस मा आमदार अमरसिंहजी पंडित यांच्या हस्ते संपन या वेळी राष्ट्रवादी चे नेते, शेख निजामभाई, फारुक पटेल, प्रा.गोपाळ धांडे. संघटनेचे प्रदेश अध्यक्ष नगरसेवक शेख अमर उपस्थित होते

या उद्घाटन प्रसंगी मा आमदार अमरसिंहजी पंडित यांनी कामगारांना मार्गदर्शन करताना सांगितले. महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना सामाजिक न्याय आणि समानता स्थापित करण्यासाठी काम करताते जेणेकरून सर्व कामगारांना समान संधी आणि वागणूक मिळेल त्याच पद्धतीने काम करावे

सर्व पदाधिकारी यांनी संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या कामाच्या अटी सुधारण्यासाठी एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यांचे काम कौतुक करण्यासारखे आहे कारण ते कामगारांना अधिक चांगल्या वेतन, कामाच्या अटी आणि सुरक्षित कामाच्या वातावरणासाठी लढायला मदत करतात येत्या काही दिवसात कामगारांचे रखडलेले समस्या बाबतीत लवकरच जिल्हा कामगार अधिकारी व कामगार संबधित कर्मचारी यांच्या समवेत जिल्ह्यातील सर्व कामगार संघटनेची बैठक लावण्यात येईल असे आश्वासन माजी आमदार अमरसिंहजी पंडित यांनी उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमात दिले

## ऊसतोड मजुरांचे मुकादम युवा उद्योजक गणेश आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण...!

### असंख्य मित्रपरिवार सोबत घेऊन वडवणी येथे केले वृक्षारोपण..

दत्ता कराड/वडवणी
(दै.महाभारत)

डोंगर पट्ट्यामधील ऊसतोड कारखान्याचे मेन मुकादम असणारे कांता बापू आंधळे यांच्या सुपुत्राचा वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा.बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ४० ते ५० लाख लोक ऊसतोड मजूर म्हणून काम करतात . कामगारांचा त्यातीलच एक भाग म्हणून वडवणी तालुक्यातील पिंपळा रुई येथील ऊसतोड कामगार यांचे मेन मुकादम असलेले कांता बापू आंधळे म्हणून यांची पूर्ण वडवणी तालुका सह बीड जिल्हा व महाराष्ट्रत ऊस पुरवठा मुकादम म्हणून अनेक ऊस कारखान्यावर ओळख आहे. व काही ठिकाणी ते कारखान्यावरील मेन मुकादम देखील आंधळे हे आहेत.आंधळे ग्रुप म्हणलं की हजारो ऊसतोड मजूर हे आपल्या पोटाची कळगी भरण्यासाठी ऊसतोड मजूर हा कांता बाप्पू आंधळे यांच्या साह्याने ऊस तोडणी करतात. त्यांच्याच सुपुत्र गणेश आंधळे यांचा दि.१४ बुधवार रोजी वाढदिवस असल्या कारणाने त्यांनी आपल्या ऊसतोड कामगारातील कुठल्याही व्यक्तीचा व विद्यार्थी वर्गाचा वाढदिवस असल्यास तो वाढदिवस वृक्षारोपण करूनच साजरा करायचा असा निर्णय देखील त्यांनी




घेतला आहे.बीड जिल्ह्यामध्ये फक्त दोन टक्के जंगल व झाडांचे प्रमाण राहिले असून बीड जिल्ह्यातील तरुण वर्गाच्या हाताला काम यावं त्याच्या तोडणे बंद होवा यासाठी खूप झाडे लावून आणि पर्यावरण वाचून यासाठीच वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात चा निर्णय घेतला आहे. आताच्या काळामध्ये वाढदिवस म्हटलं की मित्रपरिवार यांना खूप काही वेगळेपण वाटतो . वाढदिवस असल्यास मध्ये डीजे ,पार्टी , करणे या सर्व गोष्टी सोडून सामाजिक उपक्रम राबवत वाढदिवस साजरा करण्यात आला .आंधळे हे वेळोवेळी सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. आज तो त्यांच्या सामाजिक कार्याचा अजून एक उपक्रम आहे. हा त्यांच्या उपक्रम समाजातील युवा पिढीला प्रेरणादायी ठरेल. यापुढे कुठलाही मित्र परिवाराचा वाढदिवस असल्यास आपल्या गावी किंवा इतर ठिकाणी आहे त्या ठिकाणी वृक्षारोपण करूनचं साजरा करायचा असा निर्णय सर्व मित्रपरिवाराने घेतला आहे. वृक्षारोपण करता वेळी मित्रपरिवार लोकपत्रकार बाप्पासाहेब भांगे, पत्रकार दत्ता कराड, बंधू बाप्पासाहेब आंधळे, बंधू वैभव आंधळे,सुरेश चव्हाण, सोनू खाडे, धनु भांगे, अशेफ शेख, इमरान शेख,मिलिंद भांगे, रिवान पठाण ,साहिल छोटे ,सोमा आळणे ,अशोक मुंडे,अभिषेक चव्हाण ,बाळू मुंडे, बाळू सवाशे, आदी मित्रपरिवार उपस्थित होते.

## लहान मुले,तरुणाई अडकली ऑनलाईन गेमच्या विळख्यात.!

कंधार । धोंडीबा मुंडे
(दै.महाभारत)

सद्यस्थितीत जिल्ह्यासह सर्वत्र ग्रामीण भाग आणि कंधार तालुक्यात पूर्वीचे मैदानी खेळ बंद झाले,असून आता वयोवृद्धापासून ते चिमुकल्यांपर्यंत सर्वांनाच मोबाईलचे वेड लागले आहे.मोबाईलचा अतिवापर वाढला असून सर्वात मोठा विळखा चिमुकल्यांना पडला आहे. पालक व मातापित्यांनी आपले बाळ व लहान मुलांना मोबाईल पासून सावध ठेवले पाहिजे.

कंधार तालूक्यातील विद्यार्थी दररोज शाळा,कॉलेजला ये-जा करीत असतात.काही विद्यार्थी शहरातील एसटी-बस स्थानकात बसून पब्जी खेळतांना दिसून येत आहेत.अशातच विद्यार्थ्यांना माहित नसते की, बस आली आणि केव्हा गेली.तरुणाई मोठ्या प्रमाणात मोबाईलमध्ये अडकली आहे.तसेच घरी बाळाला सांभाळायला कोणी नसेल,मुलं चिडचिड व रडत असेल तर पर्याय म्हणून आईच आपले बाळ गप्प राहावा यासाठी मोबाईल गेम लावून देते. त्यामुळे बाळही गप्प बसत आहे. त्या-त्या आईला आपलं बाळ भविष्यात मोबाईलच्या आहारी जाईल हे कळत नाही. यावरुन मोठया प्रमाणात मोबाईलच्या आहारी जात असल्याने भविष्यात दृष्टी कमी होण्याचा धोका वाढत आहे.

गेल्या काही वर्षात संवादाचे माध्यम असल्याने तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला आहे. सध्या घरोघरी टीव्ही, मोबाईल, संगणक, लॅपटॉप आदी वस्तू दैनंदिन कामकाजासाठी वापरतात, नवीन पिढी तर यात पुढे आहे.तर



यात पुढे आहे. सुरुवातीला सहज दिलेला मुलांच्या हातातला मोबाईल तर आता सवयीचा भाग झाला आहे.

मोबाईलवर लुडोसारख्या अनेक गेममध्ये ते गुंतून राहतात.त्यामुळे जवळ असूनसुद्धा जवळच्याला बोलायला वेळ नसल्याचे चित्र दिसत आहे. शहरी भागात अगोदरपासूनच मुलांच्या हातात मोबाईल होता, मात्र कोरोना साथीत सगळीकडे ऑनलाईन शिक्षण चालू झाले,तेव्हापासून ग्रामीण भागातही मोबाईल मुलांच्या हातात जास्त प्रमाणात आले आहेत. त्यामुळे आता सतत मोबाईल मुलांना हातात ठेवावा वाटत असल्याचे चित्र आहे. मोबाईलमुळे लहान मुलांच्या दृष्टीवर दुष्पपरिणाम होऊन नजर कमी होते. त्यामुळे शक्यतो लहान मुलांना मोबाईल देऊ नये असे तज्ञ डॉक्टरांचे मत आहे.

# न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताच्या ५२व्या सरन्यायाधीश पदाची घेतली शपथ



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिली शपथ

नवी दिल्ली (दै.महाभारत)

राष्ट्रपति भवनात आयोजित एका विशेष समारोहात न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताच्या ५२व्या मुख्य न्यायाधीश म्हणून आज सकाळी शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.या समारोहाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीप धनगड, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग,कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना, सर्वोच्च न्यायालयाचे इतर न्यायाधीश, वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि कायदा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. निवृत्त मुख्य न्यायाधीश संजीव खन्ना यांचा कार्यकाल १३ मे २०२५ रोजी संपल्यानंतर न्यायमूर्ति गवई यांनी हे पद त्यांच्याकडून स्वीकारले.

न्यायमूर्ति भूषण रामकृष्ण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्रातील अमरावती येथे झाला. ते प्रसिद्ध राजकारणी, आंबेडकरवादी नेते, माजी खासदार आणि विविध राज्यांचे राज्यपाल राहिलेले रा.सु. गवई यांचे सुपुत्र आहेत. त्यांच्या कुटुंबाला डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या विचारांचा समृद्ध वारसा आहे आणि ते बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. न्यायमूर्ति गवई यांनी १९८५ मध्ये नागपूर विद्यापीठातून बी.ए. एल.एल.बी. पूर्ण करून आपल्या कायदेशीर कारकीर्दीला सुरुवात केली. १९८७ मध्ये त्यांनी बॉम्बे उच्च न्यायालयात स्वतंत्र वकिली सुरू केली, प्रामुख्याने नागपूर खंडपीठात. १९९२-९३ मध्ये त्यांनी सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त लोक अभियोजक म्हणून कार्य केले. २००३ मध्ये त्यांची बॉम्बे उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि २००५ पासून ते कायमस्वरूपी न्यायाधीश झाले. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून पदोन्नती मिळाली.

न्यायमूर्ति गवई यांची सरन्यायाधीशपदासाठी नियुक्ती सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठतेनुसार झाली आहे, सरन्यायाधीस संजीव खन्ना यांच्यानंतर दुसरे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २९ एप्रिल २०२५ रोजी त्यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली होती. न्यायमूर्ति गवई यांचा सरन्यायाधीश म्हणून कार्यकाल सुमारे सहा महिन्यांचा असेल. ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी वयाच्या ६५व्या वर्षी निवृत्त होतील.

सर्वोच्च न्यायालयात असताना, न्यायमूर्ति गवई यांनी अनेक ऐतिहासिक खटल्यांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. डिसेंबर २०२३ मध्ये, त्यांनी पाच न्यायाधीशांच्या खंडपीठात सहभाग घेऊन केंद्र सरकारच्या २०१९ च्या अनुच्छेद ३७० रद्द करण्याच्या निर्णयाला सर्वसंमतीने मान्यता दिली. २०१६ च्या विमुद्रीकरणाच्या निर्णयाला बरकरार ठेवणाऱ्या खंडपीठातही त्यांचा समावेश होता.














